राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विभागीय परीक्षा मराठीतून घेण्याबाबत–

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक इक्सएम-१०७६/१७,
सचिवालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ ऑगस्ट १९७६.

वाचा:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक इक्सएम/१०७६/१७, दिनांक १५ जुलै १९७६.

परिपत्रक:- राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या विभागीय परीक्षा महाराष्ट्र राजभाषा अधिनियमाच्या कलम ४ अन्वये मराठीतून घेणे आवश्यक आहे. याबाबत मुख्य अडचण अशी दिसून आली आहे की, सदर परीक्षांना लावलेली बरीचशी शासकीय नियमांची पुस्तके अद्यापही मराठीमध्ये उपलब्ध झालेली नाहीत. तरी सचिवालयीन विभागांनी अशी पुस्तके मराठीत शक्य तितक्या लवकर भाषांतरित करून घेऊन, ती मुद्रित करून घेण्याची कारवाई करण्याची जरूरी आहे. तसेच जेव्हा परीक्षांना लावलेली शासकीय नियमांची पुस्तके मराठीत भाषांतरित करून उपलब्ध होतील, तेव्हा ती पुस्तके ज्या विभागीय परीक्षांना विहित केलेली आहेत, त्या परीक्षा मराठीतून घेण्यात याव्यात व ह्या दृष्टीने आवश्यक ती सर्व पूर्व तयारी करावी.

२. जी पुस्तके अजूनही मराठीत उपलब्ध नाहीत, त्यांच्या दोन अद्यावत (दिनांक ३० जून १९७६ पर्यन्त दुरुस्त केलेल्या) प्रती, भाषा संचालकांकडे अनुवाद करण्यासाठी दिनांक १० सप्टेंबर १९७६ पर्यन्त नक्की पाठवाव्यात व त्याबाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास पाठवावा. जर काही पुस्तकाच्या बाबतीत अद्यावत प्रती सदर मुदतीत पाठविणे शक्य नसेल, तर अशी पुस्तके कोणत्या कारणास्तव भाषा संचालकांकडे पाठविता येत नाही याबाबतची परिस्थिती सामान्य प्रशासन विभागाच्या निदर्शनास आणून त्या पुस्तकांच्या बाबतीत पुढील मुदतवाढ मागून घ्यावी. सर्व सचिवालयीन विभागांनी याबाबतचे आपले अहवाल दिनांक ५ ऑक्टोबर १९७६ पर्यन्त सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावेत.

३. मराठीत उपलब्ध असलेल्या नियम पुस्तकांची यादी सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये जोडलेली आहे. सदर पुस्तके ज्या विभागीय परीक्षांना विहित केलेली आहेत, त्या परीक्षा मराठीतून घेण्याची कार्यवाही सचिवालयीन विभागांनी करावी व त्या केव्हा सुरू करण्यात येतील याबाबतचा अहवाल सामान्य प्रशासन विभागास दिनांक १ सप्टेंबर १९७६ पर्यन्त पाठवावा. परंतु जर मराठीत उपलब्ध असलेली पुस्तके परीक्षेतील प्रश्नपत्रिकेचा आंशिक भाग असतील तर त्या प्रश्नपत्रिकेतील उरलेल्या भागाशी संबंधित असलेल्या पुस्तकांचे मराठी भाषांतर करण्याचे काम तावडतोब हातात घ्यावे व अशी पुस्तके परीक्षेकरिता मराठीत उपलब्ध करून द्यावीत म्हणजे संपूर्ण प्रश्नपत्रिका मराठीतून काढता येईल.

४. विभागीय परीक्षा मराठीतून घेण्यास सुरुवात केल्यानंतर जर काही परीक्षार्थींना मराठीतून उत्तर देणे शक्य नसेल व इंग्रजीतून उत्तरे देण्याची त्यांनी परवानगी मागितली असेल, तर अशी परवानगी विभाग प्रमुखांनी प्रत्येक बाबतीत गुणावगुणांचा विचार करून द्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

मा. द. वैद्य,
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग.

शामसु-रोटा-साप्रवि- एक-४९०(१०००-८-७६)१.

कृ.मा.प.

शासनाचे सर्व सचिव,
मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग/ सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन-२८,
मंत्रालयीन सचिवालयीन विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या
सर्व विभागाध्यक्ष व विभागप्रमुख यांची कार्यालये (संबंधित सचिवालयीन
विभागांमार्फत).

---

## परिशिष्ट 'अ'

### भाषा संचालनालयाने मराठीत भाषांतरित केलेल्या व छापलेल्या पुस्तकांची यादी.

१. महाराष्ट्र कोषागार नियम खंड १.
२. महाराष्ट्र कोषागार नियम खंड २.
३. जमीन महसूल नियम पुस्तिका खंड ४.
४. जमीन महसूल नियम पुस्तिका खंड ५.
५. कृषि विभागाची लेखा पुस्तिका.
६. कार्यालयीन कार्यपद्धतीची नियम पुस्तिका (कृषि विभाग).
७. लेखा परीक्षा आक्षेप/निरीक्षण प्रतिवेदने यांचा शीघ्रतेने निर्णय लावण्यासाठी प्रारूप लेखा परीक्षा परिच्छेद वेळेवर निकालात काढण्यासाठी आणि लोकलेखा समिती/सार्वजनिक उपक्रम समिती आणि अंदाज समिती यांच्याशी संबंधित असलेल्या विषयांवर वेळेवर कार्यवाही करण्यासाठी अनुदेश निदेश ग्रंथ.
८. महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन, भत्ते आणि अन्य सोयी यासंबंधात अधिनियम, नियम आणि आदेश अंतर्भूत असलेले लघुपुस्तक.
९. जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयातील कार्यपद्धतीची नियम पुस्तिका.
१०. कार्यालयीन कार्यपद्धतीची नियम पुस्तिका, लेखा व कोषागार संचालनालय.
११. कार्यालयीन कार्यपद्धतीची नियम पुस्तिका धर्मादाय संघटनेकरिता.
१२. मुंबई स्त्रिया व मुलांच्या संस्था (अनुज्ञापन) नियम, १९५८.

---

एक-४१० (१०००-८-७९) अ.